# प्रकरण ३ भारतीय संरक्षण व्यवस्था

भारताच्या प्रत्येक भूभागाच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी भारत सरकारची आहे. राष्ट्रपती हे भारताच्या तीनही सेनादलांचे सर्वोच्च सेनापती आहेत. केंद्रीय मंत्रिमंडळातील संरक्षण मंत्री हे संरक्षण मंत्रालयाचे प्रमुख असतात. प्रधानमंत्र्यांना सुरक्षाविषयक सल्ला देण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार असतात.



## संरक्षण मंत्रालय आणि त्यातील विभाग

स्वातंत्र्यानंतर संरक्षण मंत्रालयाची निर्मिती करण्यात आली. संरक्षण मंत्रालयास मिळालेल्या संसाधनातून शासकीय धोरणांना दिशा देणे आणि मंजूर कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे हे प्रमुख कार्य या मंत्रालयाचे आहे. या मंत्रालयांतर्गत विविध विभाग पुढीलप्रमाणे आहेत.

- **संरक्षण विभाग :**
  सेनादलासंबंधी कार्य, संरक्षण अंदाजपत्रक, संरक्षण धोरण, संसदेसंबंधित कामकाज, परदेशांशी संरक्षणासंबंधी सहकार्य इत्यादी विभाग संरक्षण विभागात आहेत.

- **संरक्षण उत्पादन विभाग :**
  हा विभाग मुख्यत: तीनही संरक्षण दलांना व विभागांना लागणाऱ्या विविध उत्पादनांशी संबंधित आहे. त्यात संरक्षण उत्पादन कारखाने, संरक्षण साहित्य, सार्वजनिक उत्पादन मंडळ, विविध साहित्य व त्यांचे सुटे भाग, संरक्षणासंबंधी आयात केलेल्या साहित्याचे स्वदेशीकरण (भारतीयकरण) इत्यादी विभागांचे नियोजन व नियंत्रणाचा समावेश आहे.

- **संरक्षण संशोधन आणि विकास विभाग :**
  विविध संरक्षण साहित्यासंबंधित व त्यांच्या उत्पादनासंबंधित वैज्ञानिक माहितीविषयक सल्ला भारत सरकारला देणे व संशोधन करणे हे या विभागाचे कार्य आहे.

- **निवृत्त सैनिक कल्याण विभाग :**
  तीनही सेनादलांतील निवृत्त सैनिक, अधिकारी व इतरांचे निवृत्तीवेतन, कल्याण आणि पुनर्वसन इत्यादी कार्य या विभागाद्वारे केले जाते.

- **सैन्य व्यवहार विभाग :**
  हा विभाग स्थल सेना, नौदल आणि हवाई दल; संरक्षण मंत्रालयाचे एकात्मिक मुख्यालय; टेरिटोरियल आर्मी; तीन सेवांशी संबंधित कामे इ.; यांच्या संदर्भात कार्य करतो. हा विभाग तीन सेवांमध्ये संयुक्ततेस प्रोत्साहित करतो.

## ❍ सेनादले :

संरक्षण मंत्रालयांतर्गत मुख्यत: तीन सशस्त्र सेनादलांचा अंतर्भाव असतो, ते म्हणजे

- स्थलसेना
- नौसेना
- वायुसेना

बाह्य आक्रमणापासून देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणे हे सेनादलांचे प्राथमिक कार्य आहे. तसेच वेळोवेळी उद्‌भवणारे देशांतर्गत धोके किंवा नैसर्गिक आपत्ती, संप आणि अशांतता इत्यादी काळात सरकारला सहकार्य करणे हेसुद्‌धा सेनादलांचे कार्य आहे.

## ❍ सेनादलातील विविध हुद्दे :

**RANKS IN ARMY NAVY AND AIR FORCE AND THEIR EQUIVALENT**

| Sr. No. | Army | Navy | Air Force | |
|---|---|---|---|---|
| 1 | Field Marshal<br>फील्ड मार्शल | Admiral of the Fleet<br>ॲडमिरल ऑफ द फ्लीट | Marshal of the Air Force<br>मार्शल ऑफ द एअर फोर्स | |
| 2 | General<br>जनरल | Admiral<br>ॲडमिरल | Air Chief Marshal<br>एअर चीफ मार्शल | Chiefs of Army, Navy and Air Staff<br>स्थल सेना, नौसेना व वायुसेना प्रमुख |
| 3 | Lieutenant General<br>लेफ्टनंट जनरल | Vice Admiral<br>व्हाईस ॲडमिरल | Air Marshal<br>एअर मार्शल | |
| 4 | Major General<br>मेजर जनरल | Rear Admiral<br>रिअर ॲडमिरल | Air Vice Marshal<br>एअर व्हाईस मार्शल | |
| 5 | Brigadier<br>ब्रिगेडिअर | Commodore<br>कोमोडोर | Air Commodore<br>एअर कोमोडोर | |
| 6 | Colonel<br>कर्नल | Captain<br>कॅप्टन | Group Captain<br>ग्रुप कॅप्टन | |
| 7 | Lieutenant Colonel<br>लेफ्टनंट कर्नल | Commander<br>कमांडर | Wing Commander<br>विंग कमांडर | |
| 8 | Major<br>मेजर | Lieutenant Commander<br>लेफ्टनंट कमांडर | Squadron Leader<br>स्क्वाड्रन लीडर | |
| 9 | Captain<br>कॅप्टन | Lieutenant<br>लेफ्टनंट | Flight Lieutenant<br>फ्लाईट लेफ्टनंट | |
| 10 | Lieutenant<br>लेफ्टनंट | Sub Lieutenant<br>सब लेफ्टनंट | Flying Officer<br>फ्लाईंग ऑफिसर | |

# INDIAN ARMY RANK INSIGNIA: OFFICERS


General


Lieutenant General


Major General


Brigadier


Colonel


Lieutenant Colonel


Major


Captain


Lieutenant

# INDIAN ARMY RANK INSIGNIA: JCO/NCO/JAWANS


Subedar Major


Subedar


Naib Subedar


Regimental Havildar Major


Regimental Quarter Master Havildar


Company Havildar Major


Company Quarter Master Havildar


Havildar


Naik


Lance Naik

# INDIAN AIRFORCE RANKS

Shoulder

Sleeve



| Rank | | | | |
|---|---|---|---|---|
| Marshal of the Airforce | Air Chief Marshal | Air Marshal | Air Vice Marshal | Air Commodore |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| Group Captain | Wing Commander | Squadron Leader | Flight Lieutenant | Flying Officer |

# INDIAN NAVY RANKS

Shoulder

Sleeve



| Rank | | | | |
|---|---|---|---|---|
| Admiral Of the Fleet | Admiral | Vice Admiral | Rear Admiral | Commodore |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| Captain | Commander | Lieutenant Commander | Lieutenant | Sublieutenant |

### ❍ निमलष्करी सेनादले :

लष्करी सेनादलांच्या तुलनेत निमप्रशिक्षित, मर्यादित सुरक्षा कार्य करणारी सेनादले म्हणजे निमलष्करी सेनादले होय. त्यांची संघटनात्मक रचना, युद्धनीती, प्रशिक्षण, सहसंस्कृती आणि कार्य हे नियमित लष्करासारखेच असते, पण ते देशाच्या नियमित सेनादलांचा भाग नसतात. उदा. राष्ट्रीय रायफल्स, आसाम रायफल्स इत्यादी.

## उपक्रम

१. निवृत्त लष्करी अधिकारी किंवा सैनिकाची भारतीय सैन्याबाबत व त्यांच्या अनुभवाबाबत खालील मुद्द्यांच्या आधारे मुलाखत घ्या.

(अ) लष्करी अधिकाऱ्याचे किंवा सैनिकाचे नाव/हुद्दा

..................................................................................................................................

..................................................................................................................................

(ब) शिक्षण-प्रशिक्षण

..................................................................................................................................

..................................................................................................................................

..................................................................................................................................

(क) सेनादलातील कालावधी

..................................................................................................................................

..................................................................................................................................

(ड) सेनादलातील जबाबदारी

..................................................................................................................................

..................................................................................................................................

(इ) विशेष अनुभव

..................................................................................................................................

..................................................................................................................................

(ई) तरुणांसाठी संदेश

..................................................................................................................................

..................................................................................................................................

..................................................................................................................................

२. सशस्त्र सेनादलाच्या संकेत स्थळांना भेट द्या. तुमच्या आवडीच्या एका सेनादलाबद्‌दल अधिक माहिती संकलित करून लिहा.

३. संकेतस्थळावरून कोणत्याही एका शौर्यपदक विजेत्याची माहिती घेऊन लिहा.

7KDDLG